# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.
## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक ०३/१२/२०२४ चे ठराव**

---

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ७८४** | **विषय क्रमांक - ७८४**
**दिनांक - ०३/१२/२०२४** | **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ७८४<br>दिनांक -<br>०३/१२/२०२४ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/४०१६/२०२४ दिनांक – ०२/१२/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रजिमा-३१ चिंचवड रेल्वे स्टेशनजवळील जुना ROB पाडुन नवीन ROB बांधणेस मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ७८४<br>दिनांक -<br>०३/१२/२०२४ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/४०१६/२०२४ दिनांक – ०२/१२/२०२४ अन्वये, चिंचवड येथील रेल्वेवरील वाहतुकीसाठी दोन समांतर रेल्वे उड्डाणपुल अस्तित्वात आहेत. त्यापैकी चिंचवड स्टेशनवरुन चिंचवड गावाकडे जाताना उजव्या बाजुकडील पूल नवीन आहे. तसेच, डाव्या बाजुकडील पूल हा जुना आहे. सदरचा पूल जुना झाल्याने सदरच्या पूलाबाबत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणुक म्हणुन मे. मॅप्स ग्लोबल सिव्हीलटेक प्रा. लि. यांची मा. स्थायी समिती ठराव क्र. ७७५० दि. १६/१२/२०२० अन्वये नेमणुक करणेत आली आहे. सदरच्या ठरावानुसार पुलाचे प्रथमत: स्ट्रक्चरल ऑडिट करणे व त्यानुसार पुढील निविदा कार्यवाही करणे या संयुक्त कामाकरिता मे. मॅप्स ग्लोबल सिव्हीलटेक प्रा. लि. यांना कामाच्या निविदापूर्व कामासाठी ०.४९% व निविदापश्चात कामासाठी १.५०% असे एकुण १.९९% इतकी फी ही स्विकृत निविदा रक्कमेच्या मंजुर करणेत आली आहे.<br><br>त्या अनुषंगाने मे. मॅप्स ग्लोबल सिव्हीलटेक प्रा. लि. यांनी सदरच्या कामाचे स्ट्रक्चरल ऑडिट पुर्ण करुन त्यांचा अहवाल याविभागास सादर केला होता. सदरच्या अहवालाची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने स्वतंत्ररित्या नेमणुक केलेल्या पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनीअरींग, आकुर्डी, पुणे यांचेमार्फत छाननी करुन घेणेत आली आहे. सदरच्या कामाचा मे. मॅप्स ग्लोबल सिव्हीलटेक प्रा. लि. यांनी सादर केलेला स्ट्रक्चरल ऑडिट अहवाल हा पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनीअरींग, आकुर्डी, पुणे यांनी योग्य असल्याचे नमुद करुन पुढील कार्यवाही पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने करावी, असे सुचित केले होते. दरम्यानच्या काळात, उप मुख्य अभियंता (BridgeLine/HQ), भारतीय रेल्वे, मुंबई यांचे पत्र क्र. W.294.BR/Br Line Genl, दि. ०६/०८/२०२२ शहर अभियंता पिं. चिं. मनपा या कार्यालयास प्राप्त झाले व केलेल्या स्ट्रक्चरल ऑडिटचे सादरीकरण दि.१९/११/२०२२ रोजी करणेत आले. सदरच्या बैठकीनुसार खालील बाबी अंतिम करणेत आल्या. १) सदरच्या समितीने जुना पूल व त्यावरील अंडरपासेस यांची तोडुन पुनर्बांधणी करणे अत्यावश्यक आहे. २) दरम्यानच्या काळात लागणारी तात्पुरती दुरुस्ती व जड वाहतुकीस मनाई करुन रेल्वे |

खात्याने सुचित केल्याप्रमाणे त्वरित कार्यवाही करावी.

३) परंतू, सदरचा पूल हा अत्यंत जीर्ण झाल्याने रेल्वे विभागाशी सल्लामसलत करुन पुढील कार्यवाही अंतिम करावी.

त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विभागाने तात्पुरती डागडुजी करणेच्या दृष्टीने विषयांकित कामामध्ये अ.क्र. अ) अन्वये मर्यादित कामाची निविदा प्रसिद्ध करुन दि.१८/०४/२०२३ रोजी कार्यारंभ आदेश देणेत आला होता. सदरचे काम दि. १७/१०/२०२३ रोजी र.रु.१,२२,२२,८७२/- इतक्या रक्कमेचे विभागामार्फत अंतिम करुन घेणेत आले आहे. सदरच्या कामानंतर व जुन्या पुलाची स्थिती पाहता सदरचा जुना पूल हा Height Restrictor बसवुन जड वाहतुकीस (सर्व बसेससह) बंद करणेत आला आहे. सदर पुलावरून जड वाहतुक चालू करणेच्या दृष्टीने दि.०१/१०/२०२४ रोजी मा. आयुक्त कार्यालयात सर्व उपस्थित अधिकाऱ्यांसमवेत बैठक झाली आहे. सदरच्या बैठकीमध्ये जड वाहतुक चालू करणेच्या दृष्टीने रेल्वे विभागाशी सल्लामसलत करुन नवीन रेल्वे उड्डाणपूल बांधणेसाठी तत्वत: मान्यता देणेत आली आहे.

विषयांकित डागडुजीचे काम पुर्ण झालेनंतर या विभागाने सदरच्या पुलाबाबतची माहिती या विभागाने रेल्वे खात्यास दि.२४/०९/२०२४ रोजीच्या पत्रान्वये अवगत केली आहे. सदरच्या पत्रास रेल्वे खात्याने दि.०९/१०/२०२४ रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेस अभिप्राय सादर केला आहे. सदरच्या अभिप्रायामध्ये रेल्वे खात्याने सदरचा पूल जीर्ण झाला असल्याने व सुरक्षिततेच्या दृष्टीने महानगरपालिकेने नवीन पूल बांधणेबाबत सुचित केले आहे. सदरच्या कामास मे. मॅप्स ग्लोबल सिव्हीलटेक प्रा. लि. यांची नेमणुक मा. स्थायी समिती ठराव क्र. ७७५० दि. १६/१२/२०२० अन्वये झाली आहे. सदरच्या कामास प्रकल्प खर्चाच्या एकुण १.९९% इतकी फी मंजुर करणेत आली आहे. सदरच्या कामाचा आदेश मे. मॅप्स ग्लोबल सिव्हीलटेक प्रा. लि. यांना "प्रजिमा-३१ चिंचवड रेल्वे उड्डाणपुलाचे स्ट्रक्चरल ऑडीट करणे" या नावाने निर्गमित करणेत आलेला आहे. परंतू, सन २०२४-२५ च्या मंजुर अंदाजपत्रकात सदरच्या कामासाठी "प्रजिमा-३१ चिंचवड रेल्वे स्टेशनजवळील जुना ROB पाडुन नवीन ROB बांधणे" या लेखाशिर्षाअंतर्गत एकुण रक्कम रुपये ८० कोटींची प्रशासकीय मान्यता प्राप्त असुन २०२४-२५ च्या मंजुर अंदाजपत्रकात एकुण रक्कम रुपये ५० लाख इतकी तरतूद आहे. त्यामुळे, अंदाजपत्रकात कामाच्या नावात झालेल्या या बदलामुळे मे. मॅप्स ग्लोबल सिव्हीलटेक प्रा. लि. यांना "प्रजिमा-३१ चिंचवड रेल्वे स्टेशनजवळील जुना ROB पाडुन नवीन ROB बांधणे" या नावाचा वापर पुढील कामकाजात करणे गरजेचे आहे. सदरच्या बदलास मे. मॅप्स ग्लोबल सिव्हीलटेक प्रा. लि. यांनी अस्तित्वात असलेल्या करारनाम्यास अधीन राहून १.९९% इतक्या दरामध्ये प्रुफ चेकिंगसहित काम करणेची सहमती दर्शविली आहे. यामुळे मे. मॅप्स ग्लोबल सिव्हीलटेक प्रा. लि. यांचेकडील या ROB अंतर्गत करत असलेल्या सर्व कामांसाठी या सुधारित नावाचा वापर करणेसाठी प्रस्तुत विषयास मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ७८५** **विषय क्रमांक - ७८५**

**दिनांक - ०३/१२/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ७८५<br>दिनांक - ०३/१२/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.इक्षेका/वि/कावि/५२५/२०२४ दि.०८/१०/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.४२४५ दि.०८/१०/२०२४ अन्वये, मनपाचे इ क्षेत्रीय विदयुत मुख्य कार्यालय अंतर्गत विद्युत विषयक कामांचा सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकात समावेश करणेस, प्रशासकीय मान्यता मिळणेस व तरतूद वाढ-घट करणेस मान्यता दणे बाबत. |
| ठराव क्र. ७८५<br>दिनांक - ०३/१२/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.इक्षेका/वि/कावि/५२५/२०२४ दि.०८/१०/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.४२४५ दि.०८/१०/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका इ क्षेत्रीय विदयुत मुख्य कार्यालय अंतर्गत स्थापत्य विभागामार्फत PMAY योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी डुडुळगाव येथे निवासी गाळे बांधणेचे स्थापत्य विषयक काम चालु असुन सदर कामामध्ये विद्युत कामाचा समावेश नाही. सदर ठिकाणी फायर फायटिंग, सबस्टेशन व इतर विदयुत विषयक कामे करणे आवश्यक आहे. पुणे-आळंदी रस्त्यापासुन च-होली - लोहगांव पर्यंतचा ९० मी.रस्ता, च-होली अतंर्गत पठारेमळा, पिरदर्गा परिसरातील डी.पी.रस्ता, सैनिक कॉलनी, सेव्हन हिल्स कॉलनी या ठिकाणी स्थापत्य विभागाकडुन रस्ते विकसीत करणेत आले आहे.<br>सदर ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रकाश व्यवस्था करणेबाबत मा.नागरीक व मा.नगरसदस्य यांचेकडुन वारंवार मागणी होत असलेने सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रकाश व्यवस्था करणे आवश्यक आहे. तसेच सुरक्षेच्या दृष्टीने मनपाच्या विविध इमारतींचे विद्युत व फायर विषयक घटना टाळण्यासाठी फायर व इलेक्ट्रीक सेफ्टी ऑडिट करून त्याप्रमाणे त्यांचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे. बोपखेल ते काटे कॉलनी (च-होली) BRT मार्गावरील सर्व LED फिटींगचे हमी कालावधी संपली असल्याने वारंवार बंद पडत आहे व दुरूस्तीचा खर्च खुप होत आहे.<br>सदर दुरूस्तीचा खर्च टाळणेसाठी नवीन फिटींग बसविलेस मनपा अटी व शर्तीप्रमाणे ५ वर्ष हमी कालावधी मिळणार असलेने दुरूस्तीचा खर्च खुप प्रमाणात वाचणार आहे. तसेच सदर BRT मार्गावरील फिटींग दुरूस्तीवेळी होणारी वाहतुक कोंडीही कमी होणार आहे. ई क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत भोसरी उपविभागातील विदयुत व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी हायमास्ट दिव्यांची वार्षिक पद्धतीने चालन देखभाल दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच स्थापत्य विभागामार्फत मोशी येथे दफनभुमी विकसीत करणेचे काम चालु असल्याने सदर स्थापत्य विषयक कामासोबत विद्युत विषयक काम करणे आवश्यक आहे. सदर कामांचा विद्युत विभागाचे सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकात समावेश नाही.<br>त्यामुळे सदरच्या कामांच्या निविदा विषयक कार्यवाही करणे शक्य होत नाही. या करिता सदरच्या कामांचा मनपा विद्युत विभागाचे सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकात सोबतचे प्रपत्रात नमूद केलेप्रमाणे लेखाशिर्षावर समावेश करणेस व तरतूद उपलब्ध होणे आणि या कामांच्या निविदा कार्यवाही करणेस मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |
|---|---|

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ७८६** **विषय क्रमांक - ७८६**

**दिनांक - ०३/१२/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ७८६<br>दिनांक -<br>०३/१२/२०२४ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. क्र.बीपी/१५/कावि/०७/२०२४,दिनांक – १२/०८/२०२४ अन्वये, अर्थ संकल्पामध्ये लेखाशिर्ष निर्माणकरुन तरतूद करणेस मान्यता देणेबाबत. |
| ठराव क्र. ७८६<br>दिनांक -<br>०३/१२/२०२४ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. क्र.बीपी/१५/कावि/०७/२०२४,दिनांक – १२/०८/२०२४ अन्वये,महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील पत्र क्र.एमआरडी-३३२३/प्र.क्र.-९७/नवि-७ दिनांक- ०६ जून २०२४ रोजीचे पत्र इकडील विभागास प्राप्त झाले आहे. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२४ ब (२-१अ) अन्वये राज्य शासनाने, एक किंवा त्यापेक्षा अधिक महत्वाकांक्षी नागरी परिवहन प्रकल्प हाती घेण्याचा इरादा जाहीर केला असेल त्या बाबतीत या अधिनियमाखालील कोणत्याही नियोजन प्राधिकरणाच्या किंवा नविन नगरविकास प्राधिकरणाच्या अधिकारितेखालील क्षेत्राच्या संबंधात, पोट- कलम (२) च्या तरतुदी अन्वये बसविण्यात आणि वसूल करण्यात आलेल्या विकास आकारात शंभर टक्क्यांनी वाढ करण्यात येईल. त्याअनुषंगाने पुणे महानगरांतर्गत येणारे महत्वाकांक्षी नागरी परिवहन प्रकल्प घोषित करण्यात आले आहेत. त्यापैकी पिंपरी चिंचवड शहरामध्ये पुढील तीन प्रकल्पांचा समावेश आहे.<br><br><table><tr><th>प्रकल्पाचे नाव (मार्गिकेचे नाव)</th><th>प्रकल्प मंजुरीचा दिनांक</th><th>महत्वाकांक्षी नागरी परिवहन प्रकल्प म्हणून घोषित केल्याचा दिनांक</th></tr><tr><td>पुणे मेट्रो प्रकल्प- १ (पिंपरी चिंचवड- स्वारगेट आणि वनाज-रामवाडी)</td><td>२३.१२.२०१६</td><td>१०.०५.२०१८</td></tr><tr><td>पुणे मेट्रो मार्गिका क्र.३( हिंजवडी – शिवाजीनगर)</td><td>०९.०२.२०१८</td><td>१८.०७.२०१८</td></tr><tr><td>पुणे मेट्रो प्रकल्प- १अ (पिंपरी चिंचवड- निगडी)</td><td>१२.०३.२०२१</td><td>३१.०७.२०१९</td></tr></table><br>उपरोक्त प्रमाणे घोषित प्रकल्पांना निधी उभारण्यासाठी संस्थेने म्हणजेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी स्वतःचे स्तरावर **‘समर्पित नागरी परिवहन निधी’** उभारावयाचा आहे. आणि सदर निधीतून महत्वाकांक्षी नागरी प्रकल्पांना निधी उपलब्ध करुन द्यायचा आहे. सद्यस्थितीत बांधकाम परवानगी विभागाकडील अर्थ संकल्पीय तरतूदीमध्ये **विकास शुल्क निधी** या लेखाशिर्षाखाली वरिल रक्कम जमा झालेली आहे. त्यामुळे अर्थ संकल्पीय तरतूदीमध्ये जमेच्या बाजूस **‘समर्पित नागरी परिवहन निधी’** हे लेखाशिर्ष करणे तसेच खर्चाचे बाजूस **‘समर्पित नागरी परिवहन निधी परतावा’** हे लेखाशिर्ष निर्माण करणे आवश्यक आहे.<br>महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेमार्फत बांधकामास परवानगी देणेकामी दि.०२ डिसेंबर २०२० पासून UNIFIED DEVELOPMENT CONTROL AND PROMOTION REGULATIONS FOR MAHARASHTRA STATE**, 2020** या नविन नियमावलीची अंमलबजावणी करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने पिंपरी चिंचवड |

महानगरपालिका, बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागामार्फत UDCPR- 2020 मधील तरतूदींनुसार कामकाज करण्यात येत आहे.

सदर नियमावलीतील तरतूदीनुसार नियम **14**.2.1.2.1 मधील तरतूदीनुसार अन्वये TRANSIT ORIENTED DEVELOPMENT (TOD) Premium Charges या लेखाशिर्षामध्ये जमा होणा-या रक्कमेबाबत पुढील प्रमाणे तरतूद नमूद केलेली आहे:- In the area of Planning Authority, 50% of the amount of premium collected should be paid to the Planning Authority in the area concerned with the Urban Transport Project and remaining 50% to the Project Implementing Authority**.** या अन्वये जमा होणा-या रक्कमेपैकी ५० टक्के रक्कम नागरी परिवहन प्रकल्पाशी संबंधित क्षेत्रातील नियोजन प्राधिकरणाला संबंधित संस्थांनी द्यावयाची आहे.

या अनुषंगाने पिंपरी चिंचवड मनपा हद्दीमध्ये उक्त नमुद केलेनुसार **पुणे मेट्रो प्रकल्प- १ (पिंपरी चिंचवड- स्वारगेट आणि वनाज- रामवाडी)** व **पुणे मेट्रो प्रकल्प- १अ (पिंपरी चिंचवड- निगडी)** आणि **पुणे मेट्रो मार्गिका क्र.३ (हिंजवडी- माण- शिवाजीनगर)** या प्रकल्पांना मंजुरी मिळालेली आहे. सदर मार्गक्षेत्राबाबत **TOD zone** मध्ये जमा होणारे अधिमुल्य स्वतंत्रपणे जमा करणे व ५० टक्के रक्कम नागरी परिवहन प्रकल्पाशी संबंधित क्षेत्रातील नियोजन प्राधिकरणाला देणे आवश्यक आहे.

वरील बाबींसाठी खालीलप्रमाणे जमा व खर्च बाजूस नव्याने लेखाशिर्ष करणे आवश्यक आहे व त्याप्रमाणे खर्च बाजूस खालीलप्रमाणे तरतूद करणे आवश्यक आहे.

| **अ. क्र.** | **लेखाशिर्षाचे नाव** | **जमा बाजू** | **खर्च बाजू** |
|---|---|---|---|
| १ | समर्पित नागरी परिवहन निधी | १,००,००,००,०००/- | |
| | समर्पित नागरी परिवहन निधी परतावा | | १,००,००,००,०००/- |
| २ | पुणे मेट्रो प्रकल्प- १ (पिंपरी चिंचवड- स्वारगेट आणि वनाज- रामवाडी) | १०,००,००,०००/- | |
| | पुणे मेट्रो प्रकल्प- १ (पिंपरी चिंचवड- स्वारगेट आणि वनाज- रामवाडी) परतावा | | १०,००,००,०००/- |
| ३ | पुणे मेट्रो प्रकल्प- १अ (पिंपरी चिंचवड- निगडी) | १०,००,००,०००/- | |
| | पुणे मेट्रो प्रकल्प- १अ (पिंपरी चिंचवड- निगडी) परतावा | | १०,००,००,०००/- |
| ४ | पुणे मेट्रो मार्गिका क्र.३ (हिंजवडी-शिवाजीनगर) | ५,००,००,०००/- | |
| | पुणे मेट्रो मार्गिका क्र.३ (हिंजवडी- शिवाजीनगर) परतावा | | ५,००,००,०००/- |

| | |
|---|---|
| | उक्त नमुद केलेप्रमाणे जमा- खर्चाचे बाजूस नविन तीन लेखाशिर्ष निर्माण करणेकामी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ७८७** **विषय क्रमांक - ७८७**

**दिनांक - ०३/१२/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ७८७<br>दिनांक -<br>०३/१२/२०२४ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/३३/३८५/२०२४, दिनांक –०३/१२/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे भोसरी, मौजे बो-हाडेवाडी व मौजे मोशी येथील मंजूर विकास योजनेमधील ६०.०० मी रूंदीच्या रस्त्या बाहेर आत आणि बाहेर (Entry and Exit) साठी नकाशामध्ये दर्शविल्यानुसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६चे कलम ३७ अन्वये, फेरबदल करणेस मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ७८७<br>दिनांक -<br>०३/१२/२०२४ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/३३/३८५/२०२४, दिनांक –०३/१२/२०२४ अन्वये, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) , सडक परिवहन आणि राजमार्ग मंत्रालय, भारत सरकार यांचेमार्फत दि.२७/०८/२०२४ रोजीच्या पत्रान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील व पिंपरी चिंचवड मनपा विकास आराखड्यातील मौजे भोसरी, मौजे बो-हाडेवाडी व मौजे मोशी येथून जाणाऱ्या ६०.०० मी रूंदीच्या पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग एनएच जूना क्र.५० (नवीन क्र.६०)चे विकासनाबाबत त्यांचेमार्फत तयार करणेत आलेल्या प्रकल्प अहवालानुसार रस्त्याच्या डिझाईनप्रमाणे काही भागात प्रस्तावित केलेल्या रस्त्याच्या कर्व्ह, रँप, पूल,मेट्रो मार्ग, ग्रेड सेपरेटर,सर्व्हीस रस्त्यासाठी,युटीलीटी सर्व्हीसेस तसेच चौकासाठी व सुरक्षित वाहतूकीसाठी रस्त्याचे रूंदीकरण करणे आवश्यक आहे.सदर मौजे भोसरी, मौजे बो-हाडेवाडी व मौजे मोशी येथून जाणाऱ्या ६०.०० मी रूंदीच्या पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गाच्या रूंदीकरणाची माहिती खालीलप्रमाणे आहे. |

**अ) मौजे भोसरी येथील ६० मी रूंद रस्त्याचे रूंदीकरण महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणे**

| अ.क्र. | चैनेज | गाव | स.न./सि.स.नं. | रस्ता रूंदीकरण क्षेत्र (हेक्टर-आर) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | १५+७०० ते १६+००० | भोसरी | स.नं.६८८ पै.<br>स.नं.६९१ पै.<br>स.नं.६९० पै.<br>(सि.स.नं. ३३३८ पै. ३३३९ पै.,३३५२ पै. ३३५४ पै.,३३५५ पै. ३३५६ पै.,३३५७ पै. ३३६० पै.) | ०.०३७७<br>०.०७११<br>०.२५६७ | नकाशामधील A ते B शिवनेरी हॉस्पिटल समोरील जागा |
| २. | १७+९०० ते १८+५०० | भोसरी | स.नं.१२३ पै.<br>स.नं.१२४ पै.<br>स.नं.१३६ पै.<br>(सि.स.नं.४११६ पै. ४११४ पै., ४११३ पै. | ०.०७२३<br>०.१९५८<br>०.००६३ | नकाशामधील C ते D नितीन लांडगे यांचे पेट्रोल पंपा समोरील जागा |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | ४११२ पै.) | | |
| ३. | १८+७०० ते १९+३०० | भोसरी | स.नं.१२३ पै.<br>स.नं.११९ पै.<br>स.नं.११३ पै.<br>(सि.स.नं.४११२ पै.<br>४११८ पै.,४१०८ पै.) | -<br>०.४०२३<br>०.०३६८ | नकाशामधील E ते F पांजरपोळ मधील जागा (जय गणेश सामराज्य समोरील जागा) |
| ४. | १८+७०० ते १९+३०० | भोसरी | स.नं.९६ पै.<br>स.नं.९७ पै.<br>स.नं.९८ पै.<br>स.नं.११२ पै.<br>(सि.स.नं. ३९५० पै.<br>३९५१ पै.,३९५२ पै.<br>४१०७ पै.) | ०.०१२९<br>०.०५२२<br>०.१५९०<br>----- | नकाशामधील G ते H ई प्रभाग कार्यालयासमोरील जागा |
| | | | **एकुण क्षेत्र** | १.४४६६ | |

**ब) मौजे बो-हाडेवाडी येथील ६० मी रूंद रस्त्याचे रूंदीकरण महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणे**

| अ.क्र. | चैनेज | गाव | जुना गट नं. (नविन गट नं. ), सि.स.नं. | रस्ता रूंदीकरण क्षेत्र (हेक्टर-आर) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | १९+६०० ते २०+१०० | बो-हाडेवाडी | जुना गट नं. ८८३ पै.<br>(नविन गट नं. ५१८ पै.)<br>सि.स.नं.९४२पै<br>जुना गट नं. ८८२ पै.<br>(नविन गट नं. ५१७ पै.)<br>सि.स.न. ९४१पै. | ०.२२६४<br><br><br><br>०.०४१७ | नकाशामधील I ते J स्वामीसमर्थ मंदीरासमोरची जागा |
| २. | २२+५०० ते २२+८०० | बो-हाडेवाडी | जुना गट नं. ७४७ पै.<br>(नविन गट नं. ३७० पै.)<br>जुना गट नं. ७४६ पै.<br>(नविन गट नं. ३६९ पै.)<br>जुना गट नं. ७३८ पै.<br>(नविन गट नं. ३६१ पै.)<br>जुना गट नं. ७३९ पै.<br>(नविन गट नं. ३६२ पै.)<br>जुना गट नं. ७०९ पै.<br>(नविन गट नं. ३३३ पै.) | ०.०००१<br>०.००२५<br>०.०१५४<br>०.०००१<br>०.०१५३ | नकाशामधील K ते L मुनलाईट फॅमिली रेस्टॉरंट समोरील जागा |
| ३. | २३+४०० ते २४+१०० | बो-हाडेवाडी | जुना गट नं. १३९९ पै.<br>(नविन गट नं. २८१ पै.)<br>जुना गट नं. १३९१ पै.<br>(नविन गट नं. २७३ पै.)<br>जुना गट नं. १३९० पै.<br>(नविन गट नं. २७२ पै.) | ०.००७९<br>०.०३५३<br>०.१६४३ | नकाशामधील M ते N हॉटेल संतोष ते इंन्द्रायणी नदीपर्यंतची जागा |
| | | | **एकुण क्षेत्र** | **०.५०९०** | |

**क) मौजे मोशी येथील ६० मी रूंद रस्त्याचे रूंदीकरण महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणे**

| अ.क्र. | चैनेज | गाव | जुना गट नं. (नविन गट नं. ), सि.स.नं. | रस्ता रूंदीकरण क्षेत्र (हेक्टर-आर) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | २०+००० ते २०+४०० | मोशी | जुना गट नं. ३५५ पै.<br>(नविन गट नं. ४५१ पै.)<br>जुना गट नं. ४५० पै.<br>(नविन गट नं. ४५२ पै.) | ०.०२३७<br>०.२२५० | नकाशामधील O ते P साईनाथ हॉस्पिटल ते वाघजाई पेट्रोल पंपाससमोरील जागा |
| २. | २३+३००-२४+३५० | मोशी | जुना गट नं. ४४ पै.<br>(नविन गट नं. ४३ पै.)<br>जुना गट नं. ४३ पै.<br>(नविन गट नं. ४२ पै.)<br>जुना गट नं. ४५ पै.<br>(नविन गट नं. ४४ पै.)<br>जुना गट नं. ४८ पै.<br>(नविन गट नं. ४७ पै.)<br>जुना गट नं. ४९ पै.<br>(नविन गट नं. ४८ पै.)<br>जुना गट नं. ५० पै.<br>(नविन गट नं. ४९ पै.)<br>जुना गट नं. ५१ पै.<br>(नविन गट नं. ५०पै.)<br>इंद्रायणी नदी | ०.०१२४<br>०.०२८८<br>०.०११८<br>०.०१४६<br>०.००८५<br>०.५८४५<br>०.७१७६<br>०.२६७१ | नकाशामधील Q ते R नागेश्वर विद्यामंदीर ते इंन्द्रायणी नदीपर्यंत |
| | | | **एकुण क्षेत्र** | **१.८९४०** | |

सदर वरीलप्रमाणे दर्शविल्या प्रमाणे मौजे भोसरी, मौजे बो-हाडेवाडी व मौजे मोशी येथून जाणाऱ्या ६०.०० मी रूंदीच्या पुणे- नाशिक राष्ट्रीय महामार्गाचे रूंदीकरण करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव तयार करणे आवश्यक आहे. त्यामुळे उपरोक्तबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव तयार करणेस मान्यता देणेकामी व यासंबंधी हरकती/सुचना मागविणे व त्यावर निर्णय घेऊन प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करणेचे सर्व अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करणेस मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ७८८** **विषय क्रमांक - ७८८**

**दिनांक - ०३/१२/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ७८८ दिनांक - ०३/१२/२०२४ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.वैद्य/१४अ/कावि/१४२४/२०२४ दिनांक – ०३/१२/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेतील व सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी कार्यान्वित असलेले वैद्यकीय विम्यातील प्रति कुटुंब र.रु.३ लाखांचे वरील बिलांचे वैद्यकीय खर्चाचे बफर रक्कम अदायगी करण्याबाबत तसेच बफर वैद्यकीय खर्चाकामी स्वतंत्र लेखाशीर्ष तयार करणेस मान्यता देणेबाबत. |
| ठराव क्र. ७८८ दिनांक - | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.वैद्य/१४अ/कावि/१४२४/२०२४ दिनांक – ०३/१२/२०२४ अन्वये, |

| | |
|---|---|
| ०३/१२/२०२४ | १. मा.आयुक्त सो आदेश क्र.वैद्य/१४अ/कावि/२०५/२०२४ दि.०४/०३/२०२४ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेतील व सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांचेसाठी वैद्यकीय विमा लागू करणेकामी आदेश निर्गत करणेत आला आहे. त्याची अंतिम मुदत दि.११/०३/२०२५ पर्यंत आहे.<br>२. मा.आयुक्त सो आदेश क्र.वैद्य/१४अ/कावि/२०६/२०२४ दि.०४/०३/२०२४ व आदेश क्र.वैद्य/१४अ/कावि/२१५/२०२४,दि.०४/०३/२०२४ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेतील व सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांचेसाठी वैद्यकीय विमा लागू करणेकामी आरोग्य विमा हप्ता अदा करणेकामी आदेश निर्गत करणेत आला आहे. व त्यानुसार संपुर्ण एकुण विमा हप्ता र.रु.२७,८४,७८,६०८/- इतकी रक्कम अदा करणेत आलेली आहे. सदर विमा हप्ता रकमेमध्ये र.रु.५ कोटी इतकी रक्कम बफर म्हणून अंतर्भुत आहे. सदर रक्कमेमधून प्रति कुटुंब र.रु. ३ लाखांवरील वीस लाखांपर्यंतची वैद्यकीय बिले विमा कंपनीमार्फत मंजूर करण्यात येतात.<br>३. दि न्यू इंडिया एश्योरन्स कं.लि. यांचे दि.०८/११/२०२४ चे पत्रान्वये वैद्यकीय विम्यामध्ये देण्यात आलेली र. रु. ५ कोटी बफर रक्कम संपुष्टात आले बाबत कळविले आहे. मनपामार्फत बफर रक्कम वाढवुन देणेबाबत विमा कंपनीस कळविले असता सदर रक्कम घेण्यास विमा कंपनीने नकार देऊन प्रति कुटुंब र.रु.३ लाखांवरील वैद्यकीय बिले दि.११/११/२०२४ चे पत्रान्वये मनपामार्फत अदा करण्यात यावी, तसेच विमा कंपनी टीपीए मार्फत प्रति कुटुंब र.रु. ३ लाखांच्या वरील बिले तपासून रक्कम रुग्णालयास मनपामार्फत अदा करण्यास सादर करतील असे कळविले आहे. त्यामुळे मनपामार्फत प्रति कुटुंब र.रु. ३ लाखांवरील सर्व रुग्णालयांची बिले मनपामार्फत अदा करण्याबाबत आयुक्त यांच्या दालनात दि.०२/१२/२०२४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला.<br>मनपा अधिकारी/कर्मचारी यांना प्रति कुटुंब र.रु. ३ लाखांवरील वैद्यकीय खर्चाची रक्कम मनपामार्फत अदा करावयाची झाल्यास सदर बाब हि नव्याने सुरु करत असल्याने धोरणात्मक आहे. व त्याकामी खर्च करण्याकरिता वैद्यकीय विभागाकडे नव्याने “वैद्यकीय प्रतिपूर्ती (बफर)” या नावाने लेखाशीर्ष तयार करणे व त्यामध्ये अंदाजित रक्कम रुपये ५ कोटी इतकी रक्कम उपलब्ध करणेस मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे |
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

सही/-
**(चंद्रकांत पोपट इंदलकर)**
**नगरसचिव**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**